सकाळ

# कुलगुरूंनी घेतला 'नॅक' तयारीचा आढावा

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन १६ मार्चपासून होणार आहे. या पार्श्वभूमीवर आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सकाळी ९ ते दुपारी २ या कालावधीत विद्यापीठातील अधिविभागांच्या तयारीचा आढावा घेतला. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे या आढावा उपक्रमाचे आयोजन केले होते. डॉ. शिर्के आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी मानव्यशास्त्र इमारत, वि. स. खांडेकर भाषा भवनमधील विविध अधिविभाग, तर विद्यार्थी भवनाला भेट दिली. प्र-कुलगुरू डॉ. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी विज्ञान विद्याशाखेशी संबंधित अधिविभागांना भेटी दिल्या. या विभागांमधील स्मार्ट क्लासरूम सुरू आहेत का?, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दक्षता घेणाऱ्या सुविधांची व्यवस्था, सादरीकरणाच्या ठिकाणांवरील स्थिती, रंगरंगोटी व डागडुजी, साधनसामुग्री आदींची तपासणी केली.

जनसंपर्क कक्ष
10 MAR 2021 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रथम सत्रातील परीक्षांचे नियोजन सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाकडून प्रथम सत्राच्या परीक्षा घेण्याबाबतचे नियोजन सुरू आहे. मार्च ते एप्रिल महिन्यात या परीक्षा होण्याची शक्यता आहे. कोरोना काळात विद्यापीठ तसेच महाविद्यालये बंद होती. पण ऑनलाईनद्वारे अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. अन्य परीक्षांचे नियोजन सुरू असताना प्रथम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत महाविद्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अभ्यासक्रम कमी करण्याबाबतच्या सूचना यापूर्वी दिल्या असल्या तरी अध्यापन पूर्ण करावे, अशा सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना दिल्या आहेत.

तरुण भारत

महत्त्वाचे

# अभ्यासक्रम पूर्ण करण्यासंदर्भात महाविद्यालयांना सूचना

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर २० टक्के अभ्यासक्रम कमी केला आहे. २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका ८० टक्के अभ्यासक्रमावर तयार केल्या जाणार आहेत. तरी सर्व महाविद्यालयांनी अभ्यास मंडळाच्या वतीने दिलेल्या सूचनेनुसार अभ्यासक्रम पूर्ण करावेत. अशा सूचना अधिविभाग, महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे दिल्या आहेत. यासंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी अधिविभाग व महाविद्यालयांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ अभ्यास मंडळाने केले आहे.

पुढारी

# पदवी, पदव्युत्तरचा अभ्यासक्रम केला कमी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमासाठी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम कमी करण्यात आला आहे.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १ फेब्रुवारी रोजी बैठक झाली होती. त्या बैठकीत अभ्यासक्रम कमी करण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबतची शिफारस विद्या शाखा व विद्या परिषदेनेही मान्य केली आहे. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने याबाबतचे पत्रक महाविद्यालयांना पाठवले आहे.

अभ्यासक्रम कमी केला असला तरी अध्यापन पूर्ण करावे, असाही निर्णय घेण्यात आला असून कमी केलेल्या अभ्यासक्रमाची यादी संकेतस्थळावरही उपलब्ध करून दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 MAR 2021
लोकमत

# महाविद्यालये घेणार पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा

## २२ मार्चपासून होणार : गुळवणी समितीची शिफारस

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध विद्याशाखेतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या लेखीपरीक्षा महाविद्यालयांनी कोरोना नियमांचे पालन करून दि. २२ मार्च ते २२ एप्रिल दरम्यान घेण्याबाबतचे नियोजन करावे. या परीक्षा सुरू होण्यापूर्वी महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याची कार्यवाही पूर्ण करावी, अशा विविध शिफारसी विद्या परिषद सदस्य डॉ. मेघा गुळवणी यांच्या अध्यक्षतेखालील विद्यापीठ परीक्षा नियोजन समितीने मंगळवारी केल्या.

प्रथम वर्षाच्या परीक्षांच्या नियोजनाबाबत या समितीची मंगळवारी दुपारी चार ते सायंकाळी सहा यावेळेत विद्यापीठामध्ये बैठक झाली. त्यामध्ये प्रथम वर्षाच्या परीक्षेचा कालावधी, त्यासाठीच्या प्रश्नपत्रिकांचे स्वरूप आदींबाबत चर्चा करून या समितीने विविध शिफारसी विद्यापीठ प्रशासनाला केल्या. त्यामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित २९३ महाविद्यालयांनी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन अथवा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात आदींचा समावेश आहे.

### प्रश्नपत्रिकेचे 'एमसीक्यू' स्वरुप

हिवाळी सत्रातील परीक्षांप्रमाणे प्रथम वर्षाच्या परीक्षांसाठी ५० गुणांसाठी बहुपर्यायी (एमसीक्यू) स्वरुपातील २५ प्रश्नांचा पेपर (प्रश्नपत्रिका) असणार आहे. प्रकल्प, तोंडी आणि प्रात्यक्षिक परीक्षा महाविद्यालयांनी त्यांच्या पातळीवर घ्यावी. प्रथम वर्षाच्या विविध ३४ परीक्षा होतील. त्यासाठी साधारणत: ६० हजार परीक्षार्थी असणार आहेत.

### अध्यापन पूर्ण करावे

अभ्यास मंडळांनी यंदा पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम कमी केला असला, तरी संलग्नित महाविद्यालये, विविध अधिविभागांनी अध्यापन पूर्ण करावे, असा निर्णय अधिकारमंडळांनी घेतला आहे. त्याबाबत महाविद्यालये, अधिविभागांना सूचना केली असल्याची माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मंगळवारी दिली.

चार वर्षांपासून प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांकडून घेतल्या जात आहेत. त्यामुळे या परीक्षा घेण्यास महाविद्यालये सक्षम आहेत. त्याअनुषंगाने यंदाच्या शैक्षणिक वर्षातील परीक्षा घेण्याबाबतच्या विविध शिफारसी आमच्या समितीने विद्यापीठ प्रशासनाला केल्या आहेत. पदव्युतर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन 'नॅक'मूल्यांकनानंतर केले जाईल.

-डॉ. मेघा गुळवणी, अध्यक्ष,
विद्यापीठ परीक्षा नियोजन समिती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2021
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचे आज 'बजेट'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाची अधिसभा (सिनेट) आज, बुधवारी दुपारी बारा वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहामध्ये होणार आहे. त्यात सन २०२१-२२ या आर्थिक वर्षांमधील सुमारे ५१० कोटींच्या अंदाजपत्रकाचे (बजेट) सादरीकरण होणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हे बजेट सादर होणार असल्याने त्याकडे विद्यापीठाच्या घटकांचे लक्ष लागले आहे.

गेल्यावर्षी विद्यापीठाने ४५५ कोटी ९० लाख रुपयांचे अंदाजपत्रक अधिसभेने मंजूर केले होते. या अंदाजपत्रकातील ९ कोटी ९६ लाख रुपये इतकी तूट ही विद्यापीठ निधीतील शिलकीतून भरून काढली होती. पेटंटसाठीचा खर्च, दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत आदींसाठी त्यामधून तरतूद करण्यात आली होती.

डॉ. डी. टी. शिर्के हे त्यांच्या कुलगुरू पदाच्या कारकीर्दीतील पहिले बजेट बुधवारी अधिसभेसमोर सादर करणार आहेत. सुमारे ५१० कोटींचे हे बजेट असणार आहे. दरम्यान, अधिसभेतील प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर बजेट सादरीकरण होईल. त्यातील मुद्द्यांबरोबरच पेपरफुटी प्रकरण, ठरावांची अंमलबजावणी, किती महाविद्यालयांना बी. व्होक. पदवी अभ्यासक्रमांना मिळालेली मान्यता, गेल्या पाच वर्षांत सादर झालेले एम. फिल., पीएच.डी.चे प्रबंध, अधिसंख्य पदांचा मुद्दा, कोरोनाच्या काळात विद्यापीठ प्रशासनाने घेतलेले निर्णय, तक्रार निवारण समितीने केलेली कार्यवाही, आदींबाबत चर्चा रंगणार आहे.

दरम्यान, विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) काही प्रश्न स्वीकारण्यात आले असून काही नाकारले असल्याचे सदस्य डॉ. अरुण पाटील यांनी सांगितले.